**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २९.०७.२०२६ बुधवार**

**पोलीस आयुक्तालय अंतर्गत, गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–**

**अ)** मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक २८.०७.२०२६ रोजी, नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे तसेच, गुन्हेशाखा येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण ११ अटक आरोपींचे आदान–प्रदान हे पोलीस मुख्यालय येथील अलंकार सभागृह येथे पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल व मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव हे उपस्थित होते. तसेच आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील एकुण २८ अधिकारी व अंमलदार हे आरोपींसह हजर होते.

मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली बाबत उपस्थीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजावुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचे डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या.

**ब)** दिनांक २९.०७.२०२६ चे १०.०० वा., मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) कार्यालय येथे नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध १७ पोलीस ठाणे येथे अटक व गुन्हे अभिलेखावरील सक्रीय असे एकूण **६२ आरोपींचे** आदान–प्रदान हे मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी यांचे उपस्थीतीत पार पडले. तसेच, अलंकार सभागृह, पोलीस मुख्यालय येथे नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे अटक व गुन्हे अभिलेखावरील सक्रीय असे एकूण **६९ आरोपींचे** आदान–प्रदान हे मा. अपर पोलीस आयुक्त, श्रीमती विनीता शाहु यांचे उपस्थीतीत पार पडले.

आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. राजेश तटकरे, श्री. अंकुश खेडकर, श्री. वैभव जाधव, श्री. सुनिलसिंग पवार, श्री. शिवप्रसाद पारवे तसेच, आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथके व एमओबी पथकातील अंमलदार मोठ्या संख्येने आरोपींना घेवुन हजर होते.

मा. अपर पोलीस आयुक्त यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली बाबत उपस्थीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजावुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचे डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या. आदान—प्रदानाची प्रक्रीया सुरळीतपणे व नियमाप्रमाणे पार पडली, कोणतीही अनुचित घटना घडली नाही.




**(कामगिरी)**

**<u>१) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांनी गुन्हेगारांवर वचक बसावा तसेच, वेळेत आस्थपना बंद होणे, याकरीता एस्कॉर्ट पथक तयार केलेले आहे. पथकाद्वारे दररोज कारवाई करण्यात येते. दिनांक २८.०७.२०२६ रोजी रात्री पेट्रोलींग दरम्यान पथक प्रमुख सपोनि. भगवान कोळी यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, मिसाळ ले—आऊट, हुडको चौक, नागपूर येथे काही ईसम सट्टापट्टीचा जुगार खेळवित आहेत. अशा माहीतीवरून पथकासह रेड कार्यवाही केली असता, तेथे आरोपी १) आकाश दिपक झाडेस्वार, वय ३२ वर्षे, रा. सिध्दार्थ नगर, २) निरंजन चंदन गिरी, वय २५ वर्षे, रा. ओमनगर, काळे ले—आऊट, ३) भारत मारोतराव गजभिये, वय ६८ वर्षे, रा. गौतम नगर, गड्डीगोदाम, ४) श्याम उर्फ अजय महादेवराव गायकवाड, वय ३८ वर्षे, रा. माया नगर, हे जुगार खेळवितांना तसेच, ५) विनोद रामराव पंचांग, वय ४० वर्षे, रा. यशोदा नगर, ६) अंकुश वसंतराव शेंडे, वय ३५ वर्षे, रा. कुशी नगर, जरीपटका, ७) शुभम रविंद्र मेश्राम, वय ३२ वर्षे, रा. भिम चौक, जरीपटका, ८) विशाल प्रकाश सहारे, वय ४० वर्षे, रा. इंदोरा मैदान, जरीपटका, ९) शुभम लक्ष्मण साखरे, वय ३३ वर्षे, १०) मोहम्मद रफिक सोळंकी, वय ६५ वर्षे, दोन्हीही रा. महेंद्र नगर, पाचपावली, ११) विजय श्रीरंग खंडारे, वय ६८ वर्षे, रा. बेझनबाग, लाल शाळेजवळ हे जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. घटनास्थळावरून एकुण ११ ईसमांना ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातुन रोख ३४,०५०/—रू., वेगवेगळे कंपनीचे ०३ मोबाईल व ईतर साहीत्य असा एकुण ६७,०५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस ठाणे जरीपटका येथे आरोपींविरूध्द कलम १२(अ) म.जु.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोहवा. अनुप लोलुसरे, पोअं. अर्शद शेख, योगेश सोनवणे, साहील भोयर, आनंद चौरागडे यांनी केली.



**<u>२) कळमना पोलीसांची कामगिरी :— वाहन चोरांना अटक. ०३ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक २३.०७.२०२६ चे ०२.०० वा. ते ०७.४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत साखरकरवाडी, डिप्टी सिग्नल, कळमना येथे राहणारे फिर्यादी राकेशकुमार तुलशिराम कुर्रे, वय ४० वर्षे यांनी त्यांची स्प्लेंडर मोटारसायकल क्र. सि.बि. ०४ के.टी ८०२६ किंमती ५०,०००/—रू. ची, राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून, ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासात, कळमना पोलीसांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचून, आरोपी क्र. १) जुनैद उर्फ जुनेद असरार खान, वय १९ वर्षे, रा. मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपुर २) मोहम्मद साजीद मोहम्मद सलीम, वय १९ वर्षे, रा. कामठी, नागपुर ३) पियुष उर्फ गड्डा दिपक निमजे, वय २० वर्षे, रा. पाचपावली, नागपुर व त्यांचे एका विधीसंघर्षग्रस्त बालक साथीदारास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद वाहनचोरी केल्याची कबुली दिली. अधिक विचारपुस केली असता, त्यांनी वरील गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे कळमना हद्दीतुन काळ्या—सिल्व्हर रंगाची स्प्लेंडर गाडी क्र. एम. एच. ४९ सि.के ५७६१ किंमती ५०,०००/—रू. तसेच, लाल रंगाची बजाज पल्सर क्र. एम.एच. ३२ बि.ए. ५०४६ किंमती ८०,०००/—रू. असे एकुण ०३ दुचाकी वाहने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन ०३ दुचाकी वाहने एकुण किंमती १,८०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनात, वपोनि. प्रविण काळे, दुपोनि. करीम पठाण, पोउपनि. गजानन राऊत, पोहवा. प्रमोद कंगाले, विशाल भैसारे, पोअं. नितीन मिश्रा, ललीत शेंडे व अविनाश ग्वालबंशी यांनी केली.



**<u>३) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— हद्पार ईसमास अटक.</u>**

दिनांक २९.०७.२०२६ चे २१.५० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे बिट मार्शल हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना नियंत्रण कक्षाकडुन माहीती मिळाली की, शुभम नगर, राजीव नगर, वासनिक आटा चक्की जवळ एक ईसम धुमधाम करीत आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून, बिट मार्शल तेथे गेले असता, तेथे एक ईसम धुमधाम करतांना दिसला. तो पोलीसांना पाहुन पळु लागल्याने त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मयुर उर्फ दादु मोरेश्वर कोठेवार, वय २७ वर्षे, रा. राजीव नगर, शुभम नगर, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०६/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. गोकुळ महाजन यांचे मार्गदर्शनात, पोहवा. विक्रांत देशमुख, बिट मार्शल पोअं. प्रतीक उके व रोमीत राऊत यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे हिंगणा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २७.०७.२०२६ चे १०.३० वा. ते १७.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत जय गुरूदेव लॉज, साई संस्कृती लॉन जवळ, वेळाहरी, हिंगणा, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. कला पुंडलीक पंधरे, वय ३६ वर्ष ह्या आपले राहते घराला कुलुप लावुन आपले कामावर गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने किंमती १,७८,००००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि. निलेश आवटे ७०२०७१७३६७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे गणेशपेठ</u> :—** दिनांक २८.०७.२०२६ चे १८.२० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, कॉटन मार्केट रोड, मेट्रो पिल्लर क्र. १८० जवळील फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—रंग सावळा, केस काळे, दाढी—मिशी बारीक, अंगात चौकळीचा फुल बाहीचा शर्ट व ॲडीदास लिहीलेला हाफ पॅन्ट घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी निखील दिलीप ठाकुर, वय २७ वर्षे, रा. प्रेम नगर, झेंडा चौक, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे सपोनि. जितेंद्र गाडगे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :—** दिनांक २९.०७.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, व्हेरायटी चौक, उड्डाणपुलाखाली पिल्लरजवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० वर्षे वयाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतक हे परीसरात भिक्षा मागुन उदरनिवार्ह करीत असल्याचे लोकांनी सांगीतले. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी हर्षवर्धन उत्तम जेठे, वय २६ वर्षे, रा. कृष्णा नगर, गिट्टीखदान, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. प्रविणकुमार डहाळे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे सिताबर्डी :—** सौ. अंजनी घनशाम बावरीया, वय २५ वर्षे, रा. कोयला, तह. बावनमास, जि. सवाईमाधवपुर, राजस्थान, ह.मु.— अलंकार टॉकीज जवळील, फुटपाथवर, नागपूर ह्या दिनांक १२.०७.२०२६ १७.३० वा. पासुन पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील राहते ठिकाणाहुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, केस— काळे लांब, उंची— ५ फुट, अंगात— मेहरून रंगाचा शर्ट व ग्रे रंगाचा लेहंगा घातलेला आहे. भाषा— हिंदी/राजस्थानी बोलतात. ओळख— दोन्हीही हातात चांदीचे कडे, पायात चांदीची पायपट्टी घातलेली असुन, उजव्या हातावर स्टार चे चिन्ह गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :—** सतिष तुळशिराम घाटे, वय ८१ वर्षे, रा. सद्भावना नगर, भारत गादी भंडार समोर, नंदनवन, नागपूर हे दिनांक २२.०७.२०२६ चे १०.०० वा. पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा—सडपातळ, केस—पांढरे, अंगात—शर्ट पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी :—** कु. प्रिया राजेंद्र यादव, वय २१ वर्षे, रा. भाटा गांव, जि. रायपुर, ह.मु— महाकाली नगर, कोमल किराणा जवळ, बेलतरोडी, नागपूर ही दिनांक २४.०७.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे लांब, अंगात—लाल रंगाचा सलवार कुर्ता घातलेली आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलते.

**४) पोलीस ठाणे नंदनवन :—** कु. आफीया आझाद शेख, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. ९, वृंदावन नगर, नंदनवन, नागपूर ही दिनांक २६.०७.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, केस— काळे लांब, अंगात— सलवार सुट घातलेले आहे. भाषा—हिंदी बोलते.

**५) पोलीस ठाणे अजनी :—** सौ. अमीषा अभिषेक गडरींग, वय २५ वर्षे, रा. गल्ली नं. २, न्यु कैलास नगर, अजनी, नागपुर ह्या दिनांक २७.०७.२०२६ चे ०१.३० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून

आल्या नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट ६ इंच, केस–काळे लांब, अंगात–पांढऱ्या रंगाचा सलवार व पांढऱ्या रंगाची लॅगीन घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.


सौ. अंजनी


सतिष


कु. प्रिया


कु. आफीया


सौ. अमीषा

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. अती. मुख्य न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ४११६/२० १९ | कलम ३७९ भा.दं.वि. | आकाश सुभाषराव तोटे, वय २२ वर्षे, रा. लालगंज बारईपुरा, बिनकर पेंटर चे घराजवळ, शांतीनगर, नागपूर | ३०.०७.२०२६ |
| २ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३०८०१५७ /१९९९ | कलम ३०४(अ) भादंवि | मुकेशकुमार लालाजी तुरकर, रा. मानकापुर, शिवमंदीर समोर, लाकडी टालवाले चे घरी किरायाने, कोराडी, नागपूर | ३०.०७.२०२६ |
| ३ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३०८००१७ /२००१ | कलम ४६८, ४७१, ४२०, ३४ भा.दं.वि. | १) विलास चंद्रकांत मेश्राम, रा. इंदोरा, भंडार मोहल्ला, मोठा बुध्द विहार जवळ, जरीपटका.<br>२) मनोज देवचंद शिरसे, रा. ३/३२/३८०, विद्युत विहार कॉलोनी, कोराडी, नागपूर.<br>३) रमेश लहानुजी भालेराव, रा. बाजार चौक, महादुला, कोराडी.<br>४) शालीक किसन निस्कहे, रा. कारजगांव, गांधी घर, वरूड, पो. बेनोज, जि. अमरावती. | ३१.०७.२०२६ |
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३०८००१४ /२००० | कलम ३२४ भा.दं.वि. | मुकेश रमेश यादव, रा. गांव बोखारा, कोराडी, नागपुर. | ३१.०७.२०२६ |
| ५. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३००५८९/ २०१४ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | १) अफजल शेख सईद शेख, वय २३ वर्षे, रा. बाजार चौक, रमाई नगर, महादुला, कोराडी. | ३१.०७.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | २) शौकत शेख खाजमिया शेख, वय २४ वर्षे, रा. आंबेडकर नगर, वार्ड नं. ३, गुप्ता हॉटेल मागे, कोराडी. | |
| **६.** | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३०८०३८३ /२००० | कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, २०१ भा.दं.वि. | राजकुमार उर्फ राजु देवराव दहीकर, रा. कळमना, तह. उमरेड, जि. नागपुर ह.मु.– विद्युत विहार कॉलोनी, कोराडी, नागपुर. | ३१.०७.२०२६ |
| **७.** | मा. १६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०७००२४ /१९९९ | कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ भा.दं.वि. | १) संदीप उर्फ संतोष उर्फ बोंड्या गुरूदास टेंभुर्णे, रा. भानखेडा, उपाध्याय बिल्डींग जवळ, तहसिल, नागपुर.<br>२) छोटु उर्फ रवि उर्फ बंबईया गुलाबराव मोहोड, रा. मोतीबाग, भोसलेवाडी, प्रसाद आटा चक्की जवळ, पाचपावली, नागपुर. | ३१.०७.२०२६ |
| **८.** | मा. १६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०७०३१८ /२००१ | कलम ३२४ भा.दं.वि. | घनशाम उर्फ धानु ऋषीराम यादव, रा. धम्मदीप नगर, शंकर पार्वती मंदीर जवळ, पाचपावली, नागपुर. | ०१.०८.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**